आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विजयादशमीचा सण आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सर्वत्र उत्साह/नवी दिल्लीतल्या रावण दहन कार्यक्रमात राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांचा सहभाग

- महाराष्ट्रात शिवसेना आणि  शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दसरा मेळावे सुरु

- सरहद्दीवरच्या पायाभूत सुविधांमधे लक्षणीय योगदान देणाऱ्या ७५ विविध विकासप्रकल्पांचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने उद्घाटन

- प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेचं पोर्टल आजपासून उमेदवारांना खुलं

**आणि**

- जम्मू काश्मीरमध्ये १६ ऑक्टोबर आणि हरियाणामधे १७ ऑक्टोबरला नवीन सरकारचा शपथविधी

**<><><><><>**

विजयादशमी म्हणजेच  दसरा सणाने आज शारदीय नवरात्रौत्सवाची सांगता झाली. देशभरात विविध पद्धतीने हा सण साजरा केला जातो. उत्तर भारतात गेले ९ दिवस चाललेल्या रामलीलेची सांगता रावणदहन कार्यक्रमाने होत आहे.  नवी दिल्लीत लालकिल्ला मैदानावर आयोजित रावण दहन कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी झाले होते. उत्तरप्रदेशात गोरखपूर इथं गोरक्षपीठाधीश्वर असलेले मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या तिलकोत्सवाचा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने झाला. बंगालमधे काली आणि दुर्गापूजा उत्सवाचा

